- **<u>आरोग्य मंत्रालयाने 'विकास परिवार' अभियानाला सुरुवात केली :-</u>**

➢ आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने 5 सप्टेंबर 2017 रोजी 'मिशन परिवार विकास' नावाचे एक केंद्रीय कुटुंब नियोजन अभियान सुरू केले आहे.

➢ या अभियानाचे मुख्य लक्ष्य म्हणजे अधिकाधिक चांगल्या सेवा प्रदान करणे तसेच गर्भ निरोधक उपलब्ध होण्यास सुधारणा करणे, यासंबंधी सुरक्षा सुनिश्चित करणे आणि उच्च गुणवत्तापूर्ण कुटुंब नियोजन सेवा चांगल्या करणे, हे आहे.

➢ अभियानाचा मुख्य उद्देश्य वर्ष २०२५ पर्यन्त एकूण प्रजनन दर २.१ पर्यन्त खाली आणणे हा आहे.

➢ अभियानात उच्च प्रजनन दर असणाऱ्या देशातल्या १४६ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे. हे जिल्हे उच्च प्रजनन दर असलेल्या उत्तर प्रदेश, बिहार, मध्ये, प्रद्वेश, राजस्थान, झारखंड , छत्तीस गढ आणि आसाम या सात राज्यांमधील आहेत, जेथे देशातल्या एकूण लोकसंखेपाइकी ४४% लोकसंख्या वास्तव्य करते.

- **<u>धोनी मध्ये १०० यष्टीचीत करणारा पहिलं यष्टीरक्षक :-</u>**

➢ भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार महेन्द्रसिंह धोनी हा एकदिवसीय आंतर राष्ट्रीय क्रिकेट सामन्यांमध्ये (ODI) १०० यष्टीचीत करणारा पहिला यष्टीरक्षक (Wicketkeeper) बनला आहे. धोनीने श्रीलंकेच्या कुमार संग काराचा ९९ यष्टिचितचा विक्रम मोडत आघाडी घेतलेली आहे.

➢ २००४ साली बांग्लादेश विरुद्धच्या सामन्यात धोनीने पहिल्यांदा यष्टिचित केले. त्यावेळी त्याने रजिन सलह आणि मशरफ मोरत्झा यांना यष्टिचित केले आणि सचिन तेंडुलकर हा गोलंदाज होता.

➢ आंतरराष्ट्रीय क्रिकेट मधील यष्टीरक्षक म्हणून धोनीचा सर्वाधिक १६० यष्टिचित करण्याचा विक्रम देखील आहे. सगकाराने १३९ यष्टिचित केले आहे.

- **<u>वीजनिर्मितीत महाराष्ट्राचा देशात सहावा क्रमांक :-</u>**

➢ राज्यात दिवसेंदिवस वीजनिर्मितीत वाढ होत आहे. २०१४-१५ मध्ये राज्यात देशातील सर्वाधिक वीजनिर्मिती झाली. परंतु दरडोई वीजनिर्मितीत राज्याचा क्रमांक सहावा आहे.

➢ वीजनिर्मितीत हिमाचल प्रदेश सध्या आघाडीवर आहे. त्याखालोखाल गुजरात, छत्तीसगड, पंजाब आणि हरियानाचा क्रमांक लागतो.